नि.फौ.मा.क्र. १८४९/२०२०

शासन -वि- कैलास

**निशाणी क्रं. ०५**

**<u>सरकार तर्फे सा. क्र.२ यांची साक्ष</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नांवः प्रविण सोहनलाल मुंदडा,

वयः ५४ वर्षे, धंदा-व्यापार,

रा. पेशवे प्लॉट, यवतमाळ, ता. जि. यवतमाळ.

**<u>सरतपासणी श्रीमती एस. एस. कांबळे, सहा. सरकारी वकीलांमार्फत</u>**

दि. ०५/१०/२०१९ रोजी मी संध्याकाळी अंदाजे ०७.०० ते ०८.०० वाजेच्या सुमारास पोस्टल ग्राउंड येथे माझी दुचाकी क्र. एम.एच-२९-झेड-८४८३ हिच्याने गेलो होतो. मी पोस्टल ग्राउंडच्या बाजुला खुशबू हेअर सलूनच्या बाजुला माझी गाडी लावून आतील कार्यक्रम पाहण्यास गेलो होतो. मी थोड्या वेळाने परत आलो असता मला माझी गाडी दिसली नाही. मी लगेच यवतमाळ शहर पोलीस ठाणे येथे तक्रार देण्यास गेलो असता त्यांनी माझी तक्रार घेतली नाही व मला सांगितले की तुम्ही इकडे-तिकडे गाडी शोधा. पोलीसांनी मला तीन-चार दिवसांनी परत बोलाविले. परंतू, तेव्हा देखील माझी तक्रार घेतली नाही. शेवटी मी माझ्या गाडीचे काही झाल्यास त्याचा पुरावा माझ्या कडे पाहीजे म्हणून मी पोलीसांना जानेवारी-२०२० मध्ये तक्रार घ्यायला सांगितले. आता मला जबानी रिपोर्ट दाखवला. त्यावर माझी सही असून, त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **<u>नि. क्र. ०६</u>** देण्यात आली. आता मला छापील प्रथम खबर दाखविली. त्यावर माझी सही असून, त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **<u>नि. क्र. ०७</u>** देण्यात आली. मला एक वर्षा नंतर ग्रामीण पोलीसांनी गाडी मिळाल्याचे कळविले. तेथून माझी गाडी आम्ही यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात आणली. मला न्यायालयाच्या आदेशाने माझी गाडी परत मिळालेली

आहे. माझ्या गाडीची नंबर प्लेट काढण्यात आली होती. मला आरोपीबाबत काहीही माहीत नाही व पोलीसांनी देखील मला काही सांगितले नाही.

२. **उलटतपास आरोपीतर्फे** – आरोपीविरुध्द जाहीरनामा काढल्यामुळे तो हजर होईपर्यत उलटतपास तहकुब.

वा. दा. ब. अ. क. के.

माझे समक्ष

Digitally signed by ARCHANA MOHAN SHAH
Date: 2025.11.04 16:14:21 +0530

(श्रीमती अ. मो. शाह)
मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ
दिनांक ०४/११/२०२५.

(श्रीमती अ. मो. शाह)
मुख्य न्यायदंडाधिकारी, यवतमाळ